# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.05.2024** **वारःशुक्रवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान; राज्यातील सहा मान्यवरांचा सन्मान
2. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी प्रचार शिगेला; पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांची आज नंदुरबारमध्ये जाहीर सभा
3. बांगलादेशविरुद्धच्या 20 षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारतीय महिला संघाचा 5-0 असा विजय आणि
4. राज्याच्या काही भागात पावसाची हजेरी; आगामी दोन दिवसही पावसाचा अंदाज

**<u>राष्ट्रपती-पद्मपुरस्कार</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल देशभरातील विविध 65 मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात राज्यातील सहा मान्यवरांचा समावेश आहे. राष्ट्रपती भवनात झालेल्या या भव्य सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, तसंच वरिष्ठ केंद्रीय मंत्री उपस्थित होते. दुस-या टप्प्यात पार पडलेल्या या पद्म पुरस्कार समारंभात दोन पद्मविभुषण, आठ पद्मभुषण आणि 55 पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आले. अभिनेते चिरंजीवी आणि अभिनेत्री-नृत्यांगना वैजयंतीमाला बाली यांना पद्मविभूषण सन्मान प्रदान करण्यात आला. राज्यातील होर्मुसजी एन कामा यांना साहित्य, शिक्षण आणि पत्रकारिता क्षेत्रात, डॉ अश्विन मेहता यांना औषध निर्माण क्षेत्रात, कुंदन व्यास यांना साहित्य, शिक्षण, पत्रकारिता क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कार' तर शंकरबाबा पापळकर यांना समाजसेवा क्षेत्रात, उदय देशपांडे यांना क्रीडा प्रशिक्षण क्षेत्रात, चंद्रशेखर मेश्राम यांना औषध निर्माण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी ‘पद्मश्री पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

**<u>प्रचार</u>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीच्या प्रचारामुळे राज्यातलं वातावरण तापलं आहे. सर्वच पक्षांचे उमेदवार आता मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटींवर भर देत आहेत; तर मातब्बर नेते जाहीर सभा, प्रचार फेऱ्या आणि बैठका घेऊन मतदारांना आवाहन करत आहेत.

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज नंदुरबारमध्ये प्रचार सभा घेणार आहेत; तर भाजपाचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अहमदनगर, शिर्डी आणि पुणे लोकसभा मतदार संघात प्रचार सभांचा धडाका लावला.

ही निवडणूक देशाचा नेता निवडण्यासाठी आहे, असं फडणवीस पुण्यात बोलताना म्हणाले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या गेल्या दहा वर्षातील कामांची माहिती दिली तसंच विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. पुणे शहर भाजपच्या वतीने विकसित भारत आणि विकसित पुण्यासाठीच्या युवा संकल्प पत्राचं प्रकाशंनही काल फडणवीस यांच्या झालं.

अहमदनगर जिल्ह्याच्या दुष्काळी भागासाठी पश्चिम वाहिनी कृष्णेचं वाहून जाणारं पाणी मराठवाड्यात वळवण्यासाठी 4 हजार कोटी रुपयांची योजना करण्यात येणार असल्याचं फडणवीस यांनी अहमदनगर जिल्ह्यात सांगितलं.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला काँग्रेसमध्ये विलीनीकरणाशिवाय पर्याय नसल्याचा दावा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल अहमदनगरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल श्रीरामपूरमध्ये जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली; ही निवडणूक देशाला दिशा देणारी असल्याने डोळे उघडे ठेवून मतदान करा, असं आवाहन त्यांनी केलं.

निवडणुकीचे पुढचे टप्पे जसजसे पार पडत आहेत, तसतसे मोदी अस्वस्थ होत आहेत अशी टिप्पणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केली. ते काल साताऱ्यात वार्ताहरांशी बोलत होते.

अदानी- अंबानी कोणाचे दोस्त हे जनतेला माहित आहे असं ते म्हणाले. कांदा निर्यातीसाठी केंद्र सरकारनं लावलेला 40 टक्के कर त्वरित मागे घ्यावा, त्यासाठी राज्य सरकारनं प्रयत्न करावेत, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये केली.

ठाणे लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी काल नवीमुंबई परिसरात प्रचारफेरी काढली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा नेते गणेश नाईक, मंदा म्हात्रे आणि इतर कार्यकर्ते त्यात सहभागी झाले होते.

अंबानी अदानी यांच्याकडून काँग्रेसला पैसा मिळाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं विधान बेजबाबदारपणाचं असल्याची टीका, काँग्रेसनं केली आहे. या प्रकरणी या उद्योगपतींची चौकशी करावी, अशी मागणी काँग्रेसनं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात केली आहे.

नाशिकमधले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख सुधाकर बडगुजर यांना पोलीसांनी तडीपारीची नोटीस बजावली आहे. आपल्यावरची कारवाई राजकीय आकसापोटी झाल्याचं बडगुजर यांचं म्हणणं आहे.

**<u>मतदान जनजागृती</u>**

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवा यासाठी स्वीप अंतर्गत अनोखे उपक्रम राबवण्यात येत आहेत. ठाणे लोकसभा मतदारसंघात मतदान यंत्राचे मुखवटे अर्थात शुभंकर तयार करण्यात आले आहेत. हे चार शुभंकर संपूर्ण महापालिका क्षेत्रात फिरुन मतदानाविषयी जनजागृती करत आहेत. नाशिक महानगरपालिका आणि क्रेडाई संस्थेने मतदार जागृतीसाठी चित्रकला स्पर्धेचं आयोजन केलं होतं.

**<u>अक्षय तृतीया</u>**

वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय तृतीयेचा सण आज सर्वत्र उत्साहात साजरा केला जात आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय तृतीयेच्या दिवशी नवीन कामांचा प्रारंभ केला जातो, तसंच नवीन वस्तू, सोने-चांदी, वाहन आणि गृह खरेदीही केली जाते. अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर सर्वच बाजारपेठांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. आजच्याच दिवशी परशुराम जयंती आणि महात्मा बसवेश्वर जयंती देखील आहे. यानिमित्त, अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>निसर्गानुभव उपक्रम</u>**

पुणे वनविभागाच्यावतीने जंगलातील वातावरण अनुभवण्यासाठी दर वर्षी बुद्धपौर्णिमेला 'निसर्गानुभव' हा उपक्रम राबविण्यात येतो. यंदा 23 मे रोजी बुद्धपौर्णिमेच्या रात्री, पुणे जिल्ह्यातील विविध अभयारण्यांमध्ये हा उपक्रम राबवण्यात येणार असून, त्यात वन्यप्राणीप्रेमींनाही सहभागी होता येणार आहे. भीमाशंकर अभयारण्य, सुपे इथलं मयुरेश्वर अभयारण्य आणि ताम्हिणी अभयारण्यात या रात्री प्राणीगणना होणार आहे, यासाठी प्राणीप्रेमींची नावनोंदणी सुरु झाली असल्याची माहिती पुणे वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक तुषार चव्हाण यांनी दिली.

**<u>महावितरण-सेवा</u>**

महावितरणने राज्यातील 3 कोटी वीजग्राहकांसाठी घरबसल्या एका क्लिकवर सर्व सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून वीजग्राहकांच्या संवादपर मदतीसाठी ऊर्जा चॅट बॉट महावितरणच्या संकेतस्थळ आणि मोबाईल ॲपवर उपलब्ध करून देण्यात आलं आहे. नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून या सेवेचा ग्राहकांना लाभ घेता येईल.

**<u>महिला क्रिकेट</u>**

बांगला देशविरुद्धची वीस षटकांची क्रिकेट मालिका भारतीय महिला संघानं 5-0 अशी जिंकली आहे. बांगलादेशात सिल्हट इथं काल झालेल्या पाचव्या सामन्यात भारतानं 31 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित 20 षटकात, 5 गडी गमावून 156 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल बांगलादेशाला 20 षटकात 6 गडी गमावून 135 धावाच करता आल्या. भारताच्या राधा यादवनं 3, तर आशा शोभनानं 2 बळी घेतले.

**<u>उष्माघात</u>**

राज्यात एक मार्चपासून उष्माघाताच्या 202 रूग्णांची नोंद झाली असून एकाही रुग्णाच्या मृत्यूची नोंद झालेली नाही. सर्व जिल्हयांमध्ये उष्माघाताच्या रूग्णांवर उपचार करण्याची सुविधा पुरवण्यात आली आहे, अशी माहिती आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉक्टर राधाकिशन पवार यांनी दिली. उष्माघाताचे सर्वाधिक, 23 रूग्ण नाशिक जिल्हयात आढळले आहेत.

**<u>सोलापूर-पाणी टंचाई</u>**

सोलापूर जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाई भेडसावू लागली आहे, त्यामुळे दिवसेंदिवस टँकरची मागणीही वाढत आहे. जिल्ह्यातील 3 लाख 76 हजार 987 लोकांना पाणीटंचाईच्या झळा पोहोचत आहेत. जिल्ह्यातील 137 गाववं आणि 912 वाड्या वस्त्यांना 167 टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर, खाजगी विहीरी, कूपनलिका अधिगृहित करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत. तीव्र उन्हामुळे जिल्ह्यातील जनावरांच्या पाण्याचा आणि वैरणीचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

**<u>पाऊस</u>**

राज्याच्या काही भागात काल पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी बरसल्या. त्यामुळे गेल्या काही दिवसात उन्हाच्या तीव्र झळानी हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. पुण्याच्या काही भागात काल जोरदार वाऱ्यासह पाऊस पडला; अनेक भागात झाडं पडली आणि वाहनांचं नुकसान झालं. छत्रपती संभाजीनगर, नागपूर शहर तसंच हिंगोली, यवतमाळ आणि भंडारा जिल्ह्यात काल अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे शेतमालाचं मोठ नुकसान झालं आहे. वाशिममध्ये काल दुपारी वीज पडून एका मुलीचा मृत्यू झाला.

**<u>हवामान</u>**

येत्या 2 दिवसांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.